# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३.

## सुचना पत्र

म.औ.वि. महामंडळातील ८६५ रिक्त पदे भरणेकरीता सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने उक्त पदांच्या भरतीकरीता ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा घेण्याचे नियोजन दि. २०/०८/२०२१ ते १०/०९/२०२१ दरम्यान करण्यात येत आहे. सदर बाबतच्या सूचना उमेदवारानां ईमेल व एसएमएस द्वारे देण्यात येतील.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०५/०५/२०२१ रोजीचा आदेश व दि. ३१/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या प्रवर्गातून (SEBC) अर्ज सादर केलेला आहे. अशा अर्जदारांकरीता परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) डाऊनलोड करणे पूर्वी अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यापैकी एका विकल्पाची निवड करावयाची असून उमेदवारांनी सदर विकल्पाची निवड केल्यानंतर परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) डाऊनलोड करता येईल. त्यासंबंधित सविस्तर माहिती / सुचनापत्र महामंडळाच्या www.midcindia.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सद्यस्थितीमध्ये संपूर्ण देशभरात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव असल्याने बऱ्याच जिल्ह्यांमध्ये लॉकडाऊनची परिस्थिती असल्याने परीक्षा केंद्र उपलब्ध होण्याकरीता काही प्रमाणात अडचणी येत आहेत. त्यामुळे उमेदवारांनी निवड केलेल्या तीन पर्यायापैकी शक्यतो परीक्षा केंद्र देण्यात येईल परंतु सदर पर्याय उपलब्ध नसल्यास उमेदवारांनी निवडलेल्या पर्यायापैकी इतर नजीकच्या जिल्ह्यामध्ये परीक्षा केंद्र देण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच महामंडळातील पदांच्या भरतीबाबत सर्व माहिती महामंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतात. तरीही इतर मार्गावरुन (Social Media) प्राप्त होणाऱ्या कोणत्याही अनधिकृत माहितीवर / अफवांवर विश्वास ठेऊ नये असे सर्व उमेदवारांना कळविण्यात येत आहे.

06.08.2021

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

महाव्यवस्थापक (मबवि)
मऔविम, मुंबई-९३